# इन्स्टिटयुट ऑफ पेट्रोकेमिकल इंजिनिअरींग, लोणेरे-४०२१०३
## ता.माणगांव, जि.रायगड

(डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे)

**Website : www.dbatu.ac.in , Email-iopelonere@rediffmail.com,** दुरध्वनी : ०२१४०-२७५१०३, २७५००१


क्रमांक - ०१/०५/अभ्यासक्रम बदल/२०२२/ 1118
दिनांक - २३/०८/२०२२

सूचना

संदर्भ - संस्थेची भ्यासक्रम बदलाबाबतची सूचना क्र.०१/०५/अभ्यासक्रम बदल/२०२२/१०९५ दि.१२/०८/२०२२

सोबत जोडलेल्या उपरोक्त संदर्भिय सूचनेचे अवलोकन करावे. सदर सूचनेव्दारे व्दितीय वर्षामध्ये अभ्यासक्रम बदलाबाबतचे नियम व कार्यक्रम घोषीत करण्यात आलेला आहे. सदर सूचनेमध्ये अंशतः बदल करण्यात येत असून अभ्यासक्रम बदलाबाबतचे अर्ज संस्थेत दाखल करण्याची तारीख दि.२५/०८/२०२२ पर्यत दुपारी १२.०० वाजेपर्यत वाढविण्यात येत आहे. अभ्यासक्रम बदलाबाबतची कार्यवाही दिनांक २५/०८/२०२२ रोजी सायंकाळी ४.३० वाजता होईल व त्यावेळी संबधित विदयार्थी प्रत्यक्ष हजर असणे आवश्यक आहे याची संबधित विदयार्थ्यानी नोंद घ्यावी.

( डॉ.म.अ.दाभाडे )
प्राचार्य

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी

१. सर्व विभाग प्रमुख
२. प्रा.स.म.गायकवाड, अधिव्याख्याता, अणुविदयुत व दुरसंचार अभियांत्रिकी यांना संकेत स्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

इन्स्टिटयुट ऑफ पेट्रोकेमिकल इंजिनिअरींग, लोणेरे-४०२१०३
ता.माणगांव, जि.रायगड
(डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे)
Website : www.dbatu.ac.in , Email-iopelonere@rediffmail.com, दुरध्वनी : ०२१४०-२७५१०३, २७५००१

क्रमांक : ०१/०५/अभ्यासक्रम/२०२२/१०९५
दिनांक : १२/०८/२०२२

## सूचना

प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण होऊन खालील अटींच्या अधिन राहून ज्या विद्यार्थ्यांना ब्दितीय वर्षामध्ये अभ्यासक्रमामध्ये बदल करावयाचा आहे, त्यांनी विहित नमुन्यातील अर्ज www.iopelonere.com संस्थेच्या या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन घेवून व त्यामध्ये अचूक माहिती भरुन सदरचा अर्ज व साक्षांकित गुणपत्रिका स्कॅन करावी व गुणपत्रिकेसह अर्ज दिनांक १८/०८/२०२० रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यत संस्थेत प्रत्यक्ष जमा करावेत. अभ्यासक्रम बदलाबाबतची कार्यवाही दिनांक १८/०८/२०२२ रोजी सायंकाळी ४.३० वा. प्रत्यक्ष करण्यात येईल.

## अभ्यासक्रम बदलीसाठी अर्ज करण्यासाठी अटी :

१. विद्यार्थी प्रथम व द्वितीय सत्रातील सर्व विषयामध्ये प्रथम प्रयत्नामध्ये उत्तीर्ण असावा व ज्या विद्यार्थ्यांना प्रथम वर्षाच्या परिक्षेमध्ये जी.पी.ए. ८.०० किंवा ८.०० पेक्षा जास्त आहे अशा विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रम बदलासाठी विचार केला जाईल.
२. अभ्यासक्रम बदलासाठी मोजक्याच जागा शिल्लक असून अभ्यासक्रमनिहाय रिक्त असणाऱ्या एकूण जागांचा विचार करुन काही जागासाठी गुणवत्तनुसार अभ्यासक्रम बदल केला जाईल.
३. ज्या विद्यार्थ्यांनी टी. एफ. डब्ल्यु. एस. अंतर्गत व ई.डब्ल्यु.एस अंतर्गत प्रवेश घेतला आहे ते विद्यार्थी अभ्यासक्रम बदलास पात्र नाही.
४. ज्या विद्यार्थ्यांनी गेल्या वर्षी पुर्नप्रवेश घेतलेला आहे ते विद्यार्थी अभ्यासक्रम बदलास पात्र नाही.
५. अभ्यासक्रम बदल अर्जाचे शुल्क रु.१००/- भारतीय स्टेट बँकेच्या SB Collect द्वारे ऑनलाइन खालील खात्यामध्ये भरावे. Institute of Petrochemical Engineering, Lonere, (Diploma Admission या टॅबखाली भरावे.)
६. अभ्यासक्रम बदलाबाबतचे शुल्क रु.५००/- असून गुणवत्तेनुसार अभ्यासक्रम बदल झाल्यास सदरचे शुल्क विहीत मुदतीत भरणे आवश्यक आहे.
७. अभ्यासक्रम बदल करुन मिळालेल्या विदयार्थ्यांना विदयापीठाच्या प्रवेश संकेत स्थळावरुन Change of branch Registration करणे बंधनकारक आहे.
८. अभ्यासक्रम बदल झाल्यास आवश्यक तेथे प्रथम वर्षाचे विषय देणे अनिवार्य आहे.
९. अर्जात एकदा दिलेला अभ्यासक्रम गुणानुक्रम बदलता येणार नाही.

( डॉ.म.अ.दाभाडे )
प्राचार्य

प्रत :

१. सर्व विभागाचे विभाग प्रमुख- संबधितांना सूचित करण्यात येते की, अभ्यासक्रम बदलाबाबतची सूचना आपल्यामार्फत आपल्या विभागातील विदयार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयावी.(उपलब्ध असलेल्या इ-मेल पत्त्यावर किंवा Whats app वर )
२. प्रा.स.म.गायकवाड, अधिव्याख्याता, अणुविदयुत व दुरसंचार अभियांत्रिकी - सदरची सूचना संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी
३. लेखा विभाग
४. सुचना फलक